संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# शिक्षण संस्थांतील खर्चाचा वाढता दर्जा

देशभरात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा विविध टप्प्यांवर प्रयोग सुरू झालेला आहे. परंतु अजूनही या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत सगळीकडेच बऱ्यापैकी संभ्रम दिसतो. गेल्या दहा-पंधरा वर्षांत देशातील हजारो शिक्षण संस्थांना स्वायत्तता दिलेली आहे. तसेच शेकडो विद्यापीठांना अभिमत विद्यापीठाचाही दर्जा दिलेला आहे. स्वायत्तता आणि अभिमत विद्यापीठाचा दर्जा दिल्यानंतर त्या त्या शिक्षण संस्था त्यांना अनुकूल असलेल्या धोरणांप्रमाणे त्याची अंमलबजावणी करतात. पूर्णपणे व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून अभ्यासक्रमांची निवड केली जाते. बदलत्या काळानुसार नवे नवे अभ्यासक्रम शोधले जातात. आणि त्यासाठी आवश्यक असलेले विषय आणि पुस्तकेदेखील याच शिक्षण संस्थांकडून तयार केली जातात. त्याचा परिणाम असा झाला आहे की, नव्या शैक्षणिक धोरणाला अनुकूल असणारे वातावरण किंवा अभ्यासक्रमही अंमलात आणला जात नाही. शेवटी त्या त्या शिक्षण संस्था स्वतःच्या आर्थिक उत्पन्नावर डोळा ठेवूनच या सगळ्या अभ्यासक्रमांची रचना करीत असतात. नव्या शैक्षणिक धोरणात या स्वायत्त किंवा अभिमत विद्यापीठांच्या आर्थिक स्वावलंबनाचे किंवा आर्थिक क्षमतेचा कोणताही विचार केला गेलेला नाही. अधिकाधिक विद्यार्थ्यांना आकर्षित करता यावे म्हणून तयार केले जाणारे अभ्यासक्रम किंवा तशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे त्यांना क्रमप्राप्त ठरते. त्या त्या शिक्षण संस्थेचा परिसर, अभ्यासक्रम किंवा एकूण दर्जा पाहूनच विद्यार्थी प्रवेश घेत असतात. शिक्षण संस्थांचा हा दर्जा ठरवण्यासाठी नॅशनल असेसमेंट अँड एक्रिडेशन कौन्सिलची स्थापना केली गेली. तो दर्जा देण्याबाबतचे जे निकष आहेत. ते अधिकाधिक पाळून चांगला दर्जा मिळवण्याचा प्रयत्न त्या त्या शिक्षण संस्थांकडून केला जातो. परंतु नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत या शिक्षण संस्था किंवा अभिमत विद्यापीठांकडून फारसा उत्साह दाखवला जात नसल्याने दर्जा देण्याच्या कार्यपद्धतीतही बदल करण्याचा विचार सुरू झाला आहे. नॅकच्याऐवजी एनईपी म्हणजेच न्यू एज्युकेशन पॉलिसीला अनुसरून हा दर्जा ठरवण्याचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा प्रयत्न आहे.

**नाव बदलून काय होणार ?**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या या नव्या निर्णयातून प्रामुख्याने नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी हा हेतू दिसतो. आणि अशी अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांनाच योग्य तो दर्जा देण्याचा हेतूही त्यातून दिसून येतो. परंतु अभ्यासक्रमाव्यतिरिक्त शिक्षण संस्थांकडे असलेल्या सोयीसुविधादेखील असा दर्जा टिकवण्यासाठी महत्त्वाच्या ठरतात. त्या सोयीसुविधांसाठी भरपूर पैसाही खर्च होतो. आज अनेक खासगी विद्यापीठं अशी आहेत की ती भरमसाठ शुल्क आकारतात. त्यांचा सगळा परिसर अमेरिका, इंग्लंडमध्ये असलेल्या विद्यापीठासारखा अत्याधुनिक केलेला असतो. अनेक खासगी विद्यापीठं परदेशातल्या नामवंत विद्यापीठांशी संलग्न होऊन वेगवेगळे अभ्यासक्रमही शिकवत असतात. म्हणजेच नवीन शैक्षणिक धोरणामधून अधिकाधिक चांगला अभ्यास देण्याचा प्रयत्न झालेला आहे. परंतु हा चांगला अभ्यास करण्यासाठी भरमसाठ शुल्क आकारले जाणार असेल तर सामान्य कुटुंबातील विद्यार्थी त्याच्यापासून वंचित राहू शकतात. म्हणूनच 'नॅक'च्याऐवजी एनईपी जरी आले तरीसुद्धा ज्या महागड्या शिक्षणावर सरकारकडे कोणताच तोडगा दिसत नाही म्हणजेच केवळ नाव बदलून दर्जा सुधारणार नाही. नवीन शैक्षणिक धोरणातला उत्कृष्ट अभ्यासाचा दर्जा टिकवायचा असेल तर प्रत्येक विद्यार्थ्याला तो अभ्यासक्रम सहजपणे करता आला पाहिजे. त्यासाठी शुल्क आकारणीबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने प्राधान्याने विचार केला पाहिजे. आज 'नॅक' या संस्थेकडून अनेक शिक्षण संस्थांना गुणवत्तेचा दर्जा दिला जातो. आणि हा दर्जा मिळाल्याबरोबर त्या त्या शिक्षण संस्थांमधले शुल्कही ताबडतोब वाढते. म्हणजे उद्या एनईपी या नावाने जरी दर्जा दिला गेला. तरी शिक्षण संस्थांमधल्या या महागड्या शिक्षणाचे काय हा प्रश्न अनुत्तरीतच राहू शकतो. आज शिक्षण संस्था 'नॅक'चा हा दर्जा मिळवण्यासाठी अनेक प्रकारचे खटाटोप करीत असतात. प्रत्यक्षात या खासगी शिक्षण संस्थांमध्ये बराच सावळागोंधळ सुरू असतो. शिक्षणाचे प्रचंड वेगाने झालेले व्यावसायिकरण रोखण्याचा प्रयत्न नव्या शैक्षणिक धोरणातून झालेला दिसत नाही.

**हीच योग्य वेळ आहे**

आज ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांचीच मुले तथाकथित दर्जा असलेल्या संस्थांमधून प्रवेश घेऊ शकतात. म्हणजे अनेक विद्यार्थ्यांकडे उत्कृष्ट गुणवत्ता असूनही ते या तथाकथित दर्जा प्राप्त केलेल्या शिक्षण संस्थांमध्ये जाऊ शकत नाहीत. म्हणूनच शिक्षणाचा दर्जा किंवा शिक्षण संस्थांचा दर्जा असा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो. सरकारला नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सगळीकडे वेगाने व्हावी अशी अपेक्षा आहे. जसे या धोरणामध्ये विद्यार्थ्याला एकाचवेळी दोन पदव्या प्राप्त करता येऊ शकतात. परंतु यासाठी खासगी शिक्षण संस्थांतून दोन्हीसाठी स्वतंत्र शुल्क आकारले जाऊ शकते. आणि ते सामान्य विद्यार्थ्याला परवडू शकत नाही. नव्या शैक्षणिक धोरणाने कमीत कमी कालावधीत अधिकाधिक किंवा वेगवेगळ्या प्रकारचे शिक्षण घेण्याची संधी दिलेली आहे. परंतु या संधी साधण्याकरिता भरमसाठ शुल्कांच्या कात्रीत विद्यार्थी आणि पालक सापडू शकतात. म्हणूनच विद्यापीठ आयोगाने नव्या शैक्षणिक धोरणाच्या आग्रहाबरोबरच खासगी शिक्षण संस्थातल्या शुल्क भरण्याचीसुद्धा दिलासा देण्याची आवश्यकता आहे. त्यासंदर्भात सरकार आणि आयोगही सोयीस्कर मौन बाळगून असल्याचे दिसते. जर याबाबत योग्य तो निर्णय झाला तर शिक्षणाचे बाजारीकरण रोखणेदेखील शक्य होऊ शकेल आणि एकूणच शिक्षणाचा आणि शिक्षण संस्थांचा दर्जा सुधारू शकेल. विकसित भारताचे स्वप्न पाहायचे, पण शिक्षण संस्थेतला अपेक्षित विकास साधायचा असेल, तर तो केवळ दर्जावर अवलंबून राहणार नाही. तर शिक्षणावर होणाऱ्या खर्चावरही अवलंबून आहे हे विसरता येणार नाही. याबाबतचा योग्य निर्णय करण्याची हीच योग्य वेळ आहे.